जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026

तरुण भारत

# शिवराज्याभिषेक दिनी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळा साजरा केला जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात शनिवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाला सुरूवात होणार आहे. सदर सोहळ्यामध्ये कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते व प्र–कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरूवात केली जाणार आहे. तसेच विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शिवज्योत रॅली व राजर्षी शाहू सभागृह येथे शाहिरी पोवाडा व शिवराज्याभिषेक नृत्य सादरीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व अधिविभागातील विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांनी समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026

सकाळ

# विद्यापीठात उद्या 'शिवस्वराज्य दिन'

**कोल्हापूर :** शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. ६) सकाळी अकरा वाजता शिवस्वराज्य दिन होणार आहे. विद्यापीठाच्या प्रांगणातील या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित असतील. मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शिवज्योत रॅली, राजर्षी शाहू सभागृहात शाहिरी पोवाडा, नृत्य सादरीकरण कार्यक्रम होणार असल्याची माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक कबीर खराडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या शिव-स्वराज्य दिन सोहळा

**कोल्हापूर :** शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शनिवारी (दि.६) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात शिव-स्वराज्य दिन सोहळा होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांचे हस्ते व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्प्रा यमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शिवज्योत रॅली व राजर्षी शाहू सभागृह येथे शाहिरी पोवाडा व शिवराज्याभिषेक नृत्य सादरीकरण होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026
पुढारी

# आता 'एआय'च्या मदतीने होणार ऊर्जा वापराचे 'स्मार्ट मॉनिटरिंग'!



## इंधन संकटावर शिवाजी विद्यापीठाचे संशोधन सुरू

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाने आंतरविद्याशाखीय ऊर्जा संशोधन दृष्टिकोन स्वीकारला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, रसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान व पर्यावरण विज्ञान विभागांकडून एकत्रित हरित हायड्रोजन, सौर ऊर्जा साठवण व जैवइंधन या क्षेत्रात संशोधन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून परिसरातील ऊर्जा वापराचे 'स्मार्ट मॉनिटरिंग' केले जाणार आहे. याच्या माध्यमातून अपव्यय लक्षणीय प्रमाणात कमी होईल.

जागतिक पर्यावरण दिन यंदा 'हवामान कृती आता हवामानासाठी' या संकल्पनेखाली होत आहे. शिवाजी विद्यापीठाने ८५३ एकर परिसरास एका जिवंत हरित प्रयोगशाळेमध्ये रूपांतरित करण्याबरोबरच शून्य जीवाश्म इंधन परिसर हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यादिशेने ठोस पावले उचलली आहेत. मुख्य प्रशासन इमारतीवर १०० किलोवॅट व रसायनशास्त्र विभागाच्या छतावर ८० किलोवॅट असे एकूण १८० किलोवॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित आहेत. वसतिगृहे, अतिथिगृह व निवासी बंगल्यांमध्ये ५५ हजार २५० लिटर क्षमतेची सौर जलतापन व्यवस्था उभारली आहे.

### २८० हून अधिक महाविद्यालयांनाही होणार मार्गदर्शन

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी भवन येथे ४०० किलो क्षमतेचा बायोगॅस प्लांट उभारला आहे. स्वयंपाक घरातील ओला कचरा थेट ऊर्जेत रूपांतरित करण्याचे हे शून्य कचरा धोरण विद्यापीठाने राबवण्याचे हे राज्यातील अनोखे उदाहरण आहे. आगामी वर्षात आणखी ३५० किलोवॅट सौर क्षमता वाढवण्याचे नियोजन आहे. संलग्न २८० हून अधिक महाविद्यालयांनाही सौर रूपांतरासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

### जागतिक पर्यावरण दिन विशेष

तंत्रज्ञान विभागात १०० किलो क्षमतेचा बायोगॅस प्लांट कार्यरत आहे. यातून ४ किलो बायोगॅस तयार होतो, जो वसतिगृहाच्या मेससाठी वापरला जातो.

कोल्हापूर परिसरात साखर कारखाने जास्त असल्याने इथेनॉल उत्पादन व पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण ही एक मोठी स्थानिक संधी आहे. केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य जाहीर केले आहे. शिवाजी विद्यापीठाने स्थानिक साखर उद्योगाशी संशोधन सहकार्याचे धोरण ठेवले आहे. आगामी काळात जैवइंधन तंत्रज्ञानाचा विस्तार शेतकरी, उद्योग व पर्यावरण या तिन्हींसाठी लाभकारक ठरेल.

> पृथ्वी वापरासाठी आहे, शोषणासाठी नाही. शिवाजी विद्यापीठ केवळ सौर पॅनेल बसवत नाही तर ते एक विचारप्रणाली बदलत आहे. येत्या काही वर्षांत राज्यातील विद्यापीठांनी एकत्र येऊन असा संशोधन आराखडा तयार करायला हवा, जो महाराष्ट्र व देशाला इंधन स्वातंत्र्याच्या दिशेने घेऊन जाईल.
>
> **– डॉ. आर. के. कामत,**
> कुलगुरू,
> शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026

पुढारी

# डॉ. जयसिंगराव पवार यांना राजर्षी शाहू पुरस्कार जाहीर

## ४० वर्षांत प्रथमच मरणोत्तर पुरस्कार : जिल्हाधिकारी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा राजर्षी शाहू पुरस्कार ज्येष्ठ इतिहास संशोधक, दिवंगत डॉ. जयसिंगराव पवार यांना जाहीर झाला. ट्रस्टचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली. गेल्या ४० वर्षांत प्रथमच एखाद्या व्यक्तीला मरणोपरांत पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



राजर्षी शाहूंच्या १५२ व्या जयंतीदिनी, २६ जून रोजी खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते आणि पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरित केला जाणार आहे. समाज प्रबोधन, साहित्य, कला, संस्कृती, संगीत, शिक्षण आणि क्रीडा अशा क्षेत्रांतून राजर्षी शाहूंच्या विचारांचा प्रचार, प्रसाराचे काम करणाऱ्यांना या पुरस्काराने दरवर्षी गौरविण्यात येते. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

राजर्षी शाहूंच्या विचारांचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जागर करण्याचे काम डॉ. पवार यांनी हयातभर केले. त्यांनी संपादित केलेल्या १,२५० पानांचा 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' हा इतिहास संशोधनातील मैलाचा दगड मानला जातो. मराठा इतिहासातील दुर्लक्षित पैलूंवर सखोल प्रकाश टाकताना त्यांनी महाराणी ताराबाई, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, मराठेशाहीचा मागोवा अशा ४० पेक्षा जास्त इतिहासविषयक ग्रंथांचे लेखन व संपादन केले. 'शिवपुत्र छत्रपती राजाराम, सेनापती संताजी घोरपडे या प्रसिद्ध साहित्यकृतींना सर्वोत्कृष्ट इतिहास ग्रंथ-राज्य पुरस्काराने गौरविण्यात आले. यासह त्यांना ३५ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. दि. २६ मार्च रोजी त्यांचे निधन झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026
पुढारी

# लोकराजा राजर्षी शाहू विचारांसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या कार्याची पोचपावती

## शाहू विचारांचे भाष्यकार, इतिहासाचे गाढे अभ्यासक दिवंगत डॉ. जयसिंगराव पवार यांचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकराजा राजर्षी शाहूंचे चरित्र मराठीसह अनेक भारतीय आणि परकीय भाषांमध्ये भाषांतरीत करत लोकराजा घराघरांत पोहोचवणारे, शाहूंच्या पुरोगामी विचारांसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे शाहू विचारांचे भाष्यकार, इतिहासाचे गाढे अभ्यासक, संशोधक, दिवगंत डॉ. जयसिंगराव पवार यांच्या कार्याची पोचपावती मिळाली आहे. प्रतिष्ठेच्या राजर्षी शाहू पुरस्काराने त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाणार आहे.

आपले संपूर्ण आयुष्य मराठेशाहीचा इतिहास आणि राजर्षी शाहू महाराजांचे पुरोगामी विचार जगभरात पोहोचवण्यासाठी समर्पित करणाऱ्या डॉ. पवार यांचे नाव महाराष्ट्रातील ज्येष्ठ आणि व्यासंगी इतिहास संशोधकांत अग्रक्रमाने घेतले जाते.

सांगली जिल्ह्यातील तडसर येथे ३० डिसेंबर १९४१ रोजी जन्मलेल्या डॉ. पवार यांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधून उच्चशिक्षण घेऊन शिवाजी विद्यापीठातून इतिहासात प्रथम क्रमांकाने एम.ए. आणि त्यानंतर पीएच.डी. पूर्ण केली. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात प्राध्यापक म्हणून प्रदीर्घ काळ काम केले होते.

> “ शाहू कार्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातल्याबद्दल बाबांना राजर्षी शाहू पुरस्कार मिळावा, अशी कोल्हापूरकरांची इच्छा होती. मात्र ते स्वत: या ट्रस्टवर असल्याने त्यांनी हा पुरस्कार विनम्रतेने नाकारला होता. दुर्दैवाने त्यांच्या मृत्यूनंतर मरणोत्तर हा पुरस्कार जाहीर झाल्याचे वाईट वाटते, पण आयुष्यभर केलेल्या राजर्षी शाहू कार्याची पोचपावती व आशीर्वाद मिळाल्याचा आनंदही वाटतो.
>
> **- प्रा. डॉ. मंजुश्री पवार**
>
> डॉ. जयसिंगराव पवार यांच्या कन्या

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या कौशल्य विकास कार्यशाळा

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या रासायनिक अभियांत्रिकी विभागात प्रधानमंत्री उच्च शिक्षण अभियान (पीएम उषा) योजनेअंतर्गत शनिवार दि. ६ रोजी 'पायपिंग व प्रोसेस प्लँट इंजिनिअरिंग : कन्सेप्ट टू कमिशनिंग' या विषयावरील तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रासायनिक अभियांत्रिकी विभागाचे डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी दिली.

विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठ सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा दि. ६ ते ८ जून या कालावधीत होणार आहे. कार्यशाळेसाठी ३५ वर्षांहून अधिक औद्योगिक अनुभव असलेले आणि आयआयटी मुंबई प्रमाणित पायपिंग अभियंता नितीन जी. नागेश्वर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत तीन दिवसांत एकूण १२ सत्रांद्वारे उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सागर डेळेकर तसेच स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून रासायनिक अभियांत्रिकी विभागाचे डॉ. पाटील व त्यांचे सहकारी समन्वयक आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026
जनप्रवास

# विद्यापीठात उद्यापासून 'पायपिंग अँड प्रोसेस प्लँट इंजिनिअरिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या रासायनिक अभियांत्रिकी विभागात प्रधानमंत्री उच्च शिक्षण अभियान-पीएम-उषा योजनेअंतर्गत पायपिंग व प्रोसेस प्लँट इंजिनिअरिंग: कन्सेप्ट टू कमिशनिंग या विषयावरील तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन शनिवार, ६ जून रोजी सकाळी ९.१५ वाजता स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या सभागृहात होणार आहे. कार्यशाळेसाठी अभियंता नितीन जी. नागेश्वर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील. अशी माहिती डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ६०२ अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवारी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ६१४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. गुरूवारी विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ११ हजार ८९१ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUN 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या विविध ६१४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून सुरु आहेत. ४ जून रोजी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. आजअखेर ६१४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. ४ जूनरोजी अशा विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५७ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या.